# IEL LIMITED

*(Formerly known as Indian Extractions Limited)*
Reg. Off. - Nanavati Mahalaya, 18, Homi Mody Street, Fort, Mumbai – 400001, Maharashtra
Phone: 022-2204 4422, Fax: 022-2204 6024
Website: www.nanavatigroup.com, E-mail: iel@nanavatigroup.com
CIN - L15140MH1956PLC009720

**31st August, 2020**

**To,**
**Department of Corporate Service (DCS-CRD)**
**BSE Limited**
**Phiroze Jeejeebhoy Towers,**
**Dalal Street, Fort,**
**Mumbai – 400 001**

**Ref:** **IEL LIMITED *(FORMERLY KNOWN AS INDIAN EXTRACTIONS LIMITED)***
**SECURITY CODE NO.: 524614**

**SUB.:** **NEWSPAPER ADVERTISEMENT – NOTICE TO THE MEMBERS OF THE COMPANY REGARDING 64TH ANNUAL GENERAL MEETING TO BE HELD THROUGH VC / OAVM**

Dear Sir,

We are submitting herewith the copy of Public Notice published in newspaper of Mumbai edition viz. Mumbai Lakshadweep (Regional language) on 30th August, 2020 in compliance with Ministry of Corporate Affairs Circular No. 20/2020 dated May 05, 2020, with respect to the 64th Annual General Meeting of the members of the Company scheduled to be held on **Monday, 28th September, 2020 at 04.00 PM IST** through Video Conferencing (VC) / Other Audio Visual Means (OAVM).

You are requested to kindly take the note of the above and display the same on the notice of the exchange.

Thanking you,

Yours faithfully,

**For, IEL LIMITED *(Formerly known as Indian Extractions Limited)***

PRIYAM SHANTILAL JHAVERI
Digitally signed by PRIYAM SHANTILAL JHAVERI
Date: 2020.08.31 12:11:21 +05'30'

**Priyam S. Jhaveri**
**Director**
**(DIN: 00045038)**

**Encl: A/a**

# आ. लोणीकर यांनी बियाणे महामंडळाच्या कार्यालयासमोर केली बोगस सोयाबीनची होळी

जालना, दि.२९ (हिंदुस्थान समाचार) : मराठवाडा संपूर्ण महाराष्ट्रात सोयाबीन बियाणे कंपन्यांनी शेतकऱ्यांना बोगस बियाणे विक्री करून घोर फसवणूक केली आहे या सर्व व बियाणे कंपन्यांसह महाराष्ट्र सरकारचे बियाणे महामंडळ यांनीदेखील शेतकऱ्यांना बोगस बियाणे देऊन फसवणूक केल्याचे सिद्ध झाले आहे. जालना विभागाअंतर्गत जालना औरंगाबाद बीड व अहमदनगर या चार जिल्ह्यांमध्ये २७ हजार क्विंटल सोयाबीन बियाणे बोगस रित्या विक्री करण्यात आलेले आहे माननीय उच्च न्यायालयाने देखील याची दखल घेतली असून दोषी अधिकाऱ्यांना कोर्टात हजर करताना येत नसतील तर अटक करून कोर्टासमोर हजर करा अशा कडक शब्दात सूचना केलेल्या आहेत. असे असले तरीदेखील बियाणे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अद्याप शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिलेली नाही शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानभरपाई द्या अन्यथा होणाऱ्या परिणामांना सामोरे जा अशा कडक शब्दात लोणीकर यांनी बियाणे महामंडळाच्या अधिकाऱ्यांना खडसावले.

आज जालना येथे बियाणे महामंडळाच्या विभागीय कार्यालयासमोर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले यावेळी लोणीकर यांनी बोगस सोयाबीनची होळी केली प्रसंगी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र सरकार बियाणे महामंडळ व खाजगी कंपन्यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली यावेळी भाजप युवा मोर्चाचे प्रदेश महामंत्री राहुल लोणीकर तालुकाध्यक्ष रमेश भापकर सतीशराव निर्वळ प्रकाश टकले सभापती संदीप गोरे बिडी पवार रंगनाथ येवले उपसभापती राजेश मोरे नागेश घारे सुनिल आर्दड सर्जेराव जाधव संभाजी खंदारे माऊली शेजुळ जिजाबाई जाधव रमेश महाराज वाघ अंकुश बोबडे अशोक बरकुले यांची प्रमुख उपस्थिती होती

शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ देणे अपेक्षित आहे.

परंतु अद्याप देखील बियाणे महामंडळाच्या अधिकाऱ्यांची मुजोरी संपलेली नाही संबंधित बोगस बियाणे विक्री करणाऱ्या खाजगी कंपन्या व महाराष्ट्र सरकारचे बियाणे महामंडळ मधील दोषी अधिकारी यांच्याविरोधात जालना जिल्ह्यातील मंठा, परतुर, आष्टी, सेवली, मौजपुरी यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे त्या सर्व बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांच्या मालकाला आणि बियाणे महामंडळाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ अटक करण्यात यावी त्याचप्रमाणे बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून पूर्णपणे शेतकऱ्यांचा हंगाम वाया गेलेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे परिणामी महाराष्ट्र सरकारने तात्काळ फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी यावेळी लोणीकर यांनी केली.

# मराठवाडा विद्यापीठाच्या नावात 'भारतरत्न' किताबाचा उल्लेख करावा,

## रामदास आठवलेंना निवेदन

मुंबई, दि.२९ (हिंदुस्थान समाचार) : मराठवाडा विद्यापीठाला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या या मागणीसाठी १७ वर्षे नामांतराचा ऐतिहासिक लढा लढला. त्याला यश येऊन १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर झाले. मात्र महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १९९० मध्ये त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात भारत सरकार तर्फे 'भारतरत्न' हा सर्वोच नागरी सन्मान निर्वाणोत्तर सन्मान करण्यात आला होता. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नावात भारतरत्न या किताबाचा उल्लेख करणे आवश्यक असल्याची मागणी करणारे निवेदन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना कल्याण मधील विधिज्ञ तथा संत रोहिदास समाज प्रबोधन मंडळाचे सचिव ॲड.दिलीप वाळंज यांनी नुकतेच बांद्रा येथे सादर केले.

ॲड.दिलीप वाळंज यांच्या दाव्यानुसार कोणत्याही महनीय व्यक्तीला भारताचा पद्मश्री ;पद्मभूषण ; पद्मविभूषण ;भारतरत्न असे सर्वोच्च 'किताब दिल्यास त्यांच्या नावापूर्वी या किताबाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याबाबत पिटीशन क्र.९ /१९९४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात तसे स्पष्ट करण्यात आल्याची माहिती ॲड दिलीप वाळंज यांनी दिली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नावापुढे भारतरत्न किताबाचा उल्लेख करण्याबाबत चा या विद्यापीठाचा ठराव राज्यपालांकडे पाठविण्यात आला असून याबाबत राज्यपालांनी निर्णय घ्यावा यासाठी आठवले यांनी शिफारस करावी अशी मागणी ॲड. वाळंज यांनी आठवले यांची बांद्रा येथे संविधान निवासस्थानी भेट घेऊन केली. यावेळी रिपाइंचे अरुण पाठारे सोबत होते.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांचे वितरण ऑनलाईन

नवी दिल्ली, दि.२९ (हिंदुस्थान समाचार) : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने देशात दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांचेही वितरण केले जाते. परंतु यंदा कोरोनामुळे पहिल्यांदाच या सोहळ्याचे आयोजन राष्ट्रपती भवनात न होता ऑनलाईन होणार आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते हे पुरस्कार दिले जातात.

विविध विभागांमध्ये एकूण ७४ जणांना सन्मानित करण्यात येणार आहे. ज्यापैकी ६४ जण सोहळ्याला उपस्थित राहतील. जे मानकरी वैयक्तिकरित्या सोहळ्यात उपस्थित राहू शकत नाहीत, ते एकतर कोरोना पॉझिटिव्ह आहेत किंवा विलगीकरणात आहेत. काही खेळाडू देशाबाहेर असल्याने ते राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराच्या वितरण सोहळ्यात सहभागी होणार नाहीत. पुरस्कार प्राप्त खेळाडू आपापल्या शहराच्या स्पोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या सेंटरमधून हजर राहतील. याशिवाय क्रीडा मंत्री किरण रिजिजू आणि काही प्रमुख पाहुणे विज्ञान भवनातून या कार्यक्रमाला उपस्थिती लावतील.

---

**बँक ऑफ़ बड़ौदा**
**Bank of Baroda**

**अंबरनाथ (प) शाखा :** प्लॉट क्र. ४५, टी. ए. बिल्डींग, १५ स्टेशन रोड, अंबरनाथ (प), ४२१५०१, जि. ठाणे, फोन : ९१-०२५१ २६८३४३३/२६८५०४० (डी) २६८२६६० (जी) ई-मेल : ambarn@bankofbaroda.com

**प्रतिकात्मक ताबा नोटीस (अचल संपत्तीकरिता) (नियम ८(१) पाहावा)**

ज्याअर्थी, खाली सही करणार, **बँक ऑफ बडोदाचे** अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (२००२ चा ५४) ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह सदर कायद्याच्या कलम १३ (१२) नुसार **कर्जदार मे. हॅलो स्पेशल मसाला, मयत लाजवंती हकीमसिंग लबाना (मालक), मयत हकीमसिंग एम. लबाना (जामीनदार), मयताचे कायदेशीर वारस श्री. प्रितमसिंग हकीमसिंग लबाना (जामीनदार)** यांना **दिनांक १२.०३.२०२० रोजी मागणी नोटीस** पाठवून येणे असलेली रक्कम **रू. ८,१८,१००/- (रुपये आठ लाख अठरा हजार शंभर फक्त)** इत्यादीचे, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार आणि जामीनदार हे पूर्ण रकमेचा भरणा करू न शकल्याने कर्जदार, जामीनदार आणि सर्व सामान्य जनता यांना सूचना देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर नियमांच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ सह सदर कायद्याच्या कलम १३ उपकलम (४) नुसार दिलेल्या अधिकारान्वये खाली उल्लेखिलेल्या मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक २५.०८.२०२० रोजी** घेतला आहे.

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्व सामान्य जनता यांना जाहीर सावधानतेची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार केला गेला तर तो **बँक ऑफ बडोदाच्या** येणे असलेली रक्कम **रू. ८,१८,१००/- (रुपये आठ लाख अठरा हजार शंभर फक्त)** अधिक पुढील व्याज इत्यादी बोजासह असेल.

**मिळकतीवरील बोजा कर्जफेड करुन उतरवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेबाबत कर्जदाराचे ध्यान कलम १३ उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येते.**

**अचल संपत्तीचे वर्णन**

उल्हासनगर- ४२१००३, जि. ठाणे, महाराष्ट्र, येथील गुरुनानक जिरा चौक, सेंट्रल हॉस्पिटल जवळ, शीट नं. ४०, कॅंप नं. ३, बराक नं. ७०३ च्या समोर, युनिट नं. ७, मधील दुकान.

**चतु:सिमा- उत्तरेस-** दुकाने/कलानी हाऊस, **दक्षिणेस-** मिलिंद दर्शन बिल्डिंग, **पूर्वेस-** चाळ रुम नं. ६, **पश्चिमेस-** रस्ता/ गुरुनानक चौक

**दिनांक : २५.०८.२०२०**
**ठिकाण : ठाणे**
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडोदा,**
**अंबरनाथ (प) शाखा**

---

# मालेगावातील कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात असली तरी नागरिकांनी गाफील राहू नये- धनंजय निकम

मालेगाव, दि. २९ ( हिंदुस्थान समाचार) : मालेगाव शहरातील कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात असली तरी नागरिकांनी गाफील राहू नये. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक असल्याची माहिती घटना व्यवस्थापक तथा अपर जिल्हाधिकारी धनंजय निकम यांनी दिली. कोरोना विषाणूच्या आजाराचा वाढता प्रादुर्भाव पाहता आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

निकम म्हणाले, कोरोना विषाणूचे वाढते रुग्ण ही चिंतेची बाब आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाने आरोग्य विभागाच्या माध्यमातून सर्वंकष प्रयत्न करावेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांना सुरक्षित अंतर, मास्कच्या नियमीत वापरासाठी प्रवृत्त करावे. शहरातील पश्चिम भागासह ग्रामीण भागातील कोरोना विषाणूच्या रुग्णांवर औषधोपचार करतानाच संभाव्य रुग्ण वाढीचे नियोजन करून डि.सी.एच.सी. सेंटर सज्ज ठेवावेत. निकम यांनी शहरासह ग्रामीण भागातील दाखल रुग्णांचा आढावा घेतला. कॉन्टॅक्ट ट्रेसींग, नवीन रुग्णांच्या तपासण्या, उपलब्ध औषधसाठा व ऑक्सिजनचा पुरवठा आदी बाबींचा आढावा घेत, एम.एस.जी.कोवीड सेंटर मधील प्राप्त तक्रारींची दखल घेवून आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या सुचना त्यांनी केल्या. दाखल रुग्णांना सकस आहाराचा पुरवठा करावा. कोवीड सेंटर मधील स्वच्छता गृहांची नियमीतपणे साफसफाई करण्याबाबत मनपा प्रशासनाने दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. तर प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबरोबरच नागरिकांनी देखील आरोग्य प्रशासनाच्या सुचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# सीपीआरमध्ये बेडची क्षमता वाढवा - हसन मुश्रीफ

कोल्हापूर, दि.२९ (हिंदुस्थान समाचार) : कोव्हिड केअर सेंटरमध्ये गरीब रुग्ण उपचार घेत आहेत. या सेंटरमध्ये उपचार घेत असलेले रुग्ण अत्यवस्थ झाल्यास, अशा रुग्णांना सीपीआरमध्ये बेड उपलबध होणे गरजेचे आहे. यासाठी सीपीआरमध्ये बेडची क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच नॉन कोव्हिड रुग्णांना उपचार मिळण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशी सूचना ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ग्राम विकास मंत्री श्री. मुश्रीफ यांनी जिल्ह्यातील वाढती कोरोना रुग्ण संख्या, उपलब्ध बेड, खासगी हॉस्पिटल आणि करण्यात येत असलेले उपचार या बाबतचा आढावा घेतला. बैठकीस जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, प्र. निवासी उपजिल्हाधिकारी दत्तात्रय कवितके, अधीष्ठाता डॉ. चंद्रकांत मस्के, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बी. सी. केम्पीपाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. योगेश साळे आदी, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी धनंजय इंगळे उपस्थित होते. ग्रामविकास मंत्री म्हणाले, गेले पाच महिने शासन व प्रशासन कोरोना साथीशी लढा देत आहे. कोरोना रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा मिळाव्यात यासाठी कोव्हिड केअर सेंटर प्रत्येक तालुक्यात सुरु केले आहे. कोव्हिड केअर सेंटरवर उपचार घेणारे रुग्ण हे सर्वसामान्य असतात. या सेंटरवरील कोरोना रुग्ण अत्यवस्थ झाल्यास अशा रुग्णास सीपीआरकडे पुढील उपचारासाठी पाठविले जाते. अशा रुग्णास बेड उपलब्ध व्हावा यासाठी सीपीआरमध्ये बेडची संख्या वाढविण्यास प्राधान्य द्यावे.

श्री. मुश्रीफ म्हणाले, कोरोनाच्या रुग्णांवर उपचारासाठी प्राधान्य देण्यात येत असल्याने नॉन कोव्हिड रुग्णांची गैरसोय होत आहे. यासाठी प्रशासनाने नॉन कोव्हिड रुग्णांवरील उपचारासाठी पर्यायी व्यवस्था करावी. कोल्हापूर शहराबरोबर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वाढणारी रुग्ण संख्या ही चिंतेची बाब असली तरी कोरोना साथरोग प्रतिबंधासाठी प्रशासन चांगले काम करत आहे. प्रशासनास आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. प्रशासनामार्फत राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करुन ते शासनस्तरावरुन मंजूर करुन घेतले जातील. वाढती रुग्ण संख्या विचारात घेता लागणारी औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन ठेवावीत. रेमडिसीव्हीर आणि पीपीई कीट याबाबतचा आढावाही ग्रामविकास मंत्री श्री. मुश्रीफ यांनी घेतला.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विभुती विजय बने, राहणार ९०१, गिरीराज कृष्णा टॉवर, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई हे फ्लॅट नं. ४१, ४था मजला, रोझ को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., जन कल्याण नगर, ऑफ मारबे रोड, मालाड (प.), मुंबई ४०००९५ (यानंतर ज्यांचा उल्लेख सदरचा फ्लॅट असा केला जाईल) या फ्लॅटचे कायदेशीर मालक आहेत.

सदरचा वर नमुद केलेला फ्लॅट हा आमचे अशिल व त्यांचे वडील श्री. विजय गोपाळराव बने यांचे संयुक्त नावे होता. आमच्या अशिलांचे वडील श्री. विजय गोपाळराव बने हे दि. ०९.०९.२०१५ रोजी मयत झाले असून त्यांचे पश्चात सदरचा फ्लॅट हा आमचे अशिलांच्या ताबेकब्जात व वहीवाटीत आहे. सदरच्या फ्लॅटचा भाग दाखला (share Certificate) हे सुध्दा आमच्या अशिलांचे नांवे आहे. सबब सदरचा फ्लॅट विकण्याचा कायदेशीर हक्क, अधिकार आमचे अशिलास आहे. सदरचा फ्लॅट हा आमचे अशिलांनी इच्छुक खरेदिदारास योग्य त्या प्रचलित बाजार भावाप्रमाणे विकण्याचे ठरविले आहे.

तरी सदर फ्लॅट संदर्भात कोणाचाही कोणताही वारसा हक्क, मालकी हक्क, हितसबंध, गहाण, दान, बक्षीसपत्र लीन, लिज, पोटगी दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसबंध हक्क असल्यास त्याबाबतच्या हरकती योग्य त्या कागदपत्रासह ही नोटीस प्रसिध्द होताच १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले असून असे समजुन आमचे अशिल सदर फ्लॅटचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**सौ. वंदना एन्. दळवी**
**श्री. सुरेश एन. कांबळे**
**वकील उच्च न्यायालय**
**१२, प्रभात सेंटर, से. १अे, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई, फोन नं.०२२ २७५७०६९९**

# गणपती विसर्जन घरीच करावे; गर्दीत जाणे टाळा!

बुलडाणा, दि.२९ (हिंदुस्थान समाचार) : जागतिक कोविड - १९ या साथरोगाचे प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर जिल्ह्यात २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबरपर्यंत गणेशोत्सव अत्यंत साध्या पद्धतीने, घरच्या घरी साजरा करण्याचे राज्य शासनाचे निर्देश होते. त्यानुसार जिल्ह्यात सार्वजनिक श्री गणेश उत्सव मंडळांना परवानगी देण्यात येवू नये, असा निर्णय जिल्हा शांतता समितीच्या २० जुलै रोजी आयोजित बैठकीत घेण्यात आला. तसेच श्रींच्या आगमन व विसर्जनाची मिरवणूक काढण्यात येवू नये असे निर्देशही देण्यात आले. तरी नागरिकांनी १ सप्टेंबर रोजी होणारे श्रींचे विसर्जन घरच्या घरी करावे. कोविड साथरोगाच्या पार्श्वभूमीवर गर्दीत जाणे टाळावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

श्रीगणेश मूर्ती शाळू मातीची किंवा पर्यावरण पूरक असल्यास घरच्या घरी विसर्जन करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास मुर्तीचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनावेळी किंवा पुढील वर्षी भाद्रपद महिन्यात विसर्जनाच्या वेळी करता येणे शक्य आहे.

# ओडीशात कोरोनाचे ३२५२ नवे रुग्ण

भुवनेश्वर, दि.२९ : ओडीशात एका दिवसात कोरोनाचे ३२५२ नवे रुग्ण आढळले आहेत. २५०३ नागरिक बरे झाले आहेत. १४ मृत्यू नोंदविण्यात आले आहे. राज्यात एकूण रुग्ण संख्या ९७९२० झाली असून एकूण २९५७१ कोरोना सक्रीय रुग्ण आहेत. ६७८२६ नागरिक उपचार घेवून बरे झाले आहे. १९८७ नागरिक विलगीकरण प्रक्रियेत आहेत. राज्यात एकूण १६७०९१० चाचण्या घेण्यात आल्या. १२६५ नागरिकांना स्थानिक संपर्कातून संसर्ग झाला.

**पिल्लर इन्व्हेस्टमेंट कंपनी लिमिटेड**

**सीआयएन:**एल६५९९३एमएच१९८२पीएलसी३३१३३०
फ्लॅट क्र.१४०१, १४वा मजला, धुक्का चेंबर्स प्रिमायसेस कोसोलि., पोद्दार रोड, मालाड (पुर्व), मुंबई-४०००९७. **दूर.:** ७५०६३२६९९९
**ई-मेल:**pillarinvestment9@gmail.com
**वेबसाईट:**www.pillarinvestments.in

**बोर्ड मिटींगची सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स) च्या नियम ४७ सहवाचिता २९ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता मर्यादित पुनर्विलोकन अहवालासह अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मान्यता देणे याकरिता शनिवार, ५ सप्टेंबर, २०२० रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.

सदर सूचना कंपनीच्या http://www.pillarinvestments.in वेबसाईटवर आणि स्टॉक एक्सचेंजच्या http://www.msei.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

यापुढे, पुर्वी कळविल्यानुसार, सेबी (प्रोहिबिशन ऑफ इन्सायडर ट्रेडिंग) रेग्युलेशन्स २०१५ आणि कंपनीचे पदसिद्ध व्यक्तींद्वारे नियमन, पर्यवेक्षण व अहवाल व्यापाराचे सांकेतांकानुसार कंपनीची व्यापार खिडकी सर्व पदसिद्ध व्यक्ती आणि त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्याकरिता १ जुलै, २०२० पासून जनतेकडे निष्कर्ष घोषित केल्यानंतर ४८ तासपर्यंत बंद ठेवण्यात येईल.

**पिल्लर इन्व्हेस्टमेंट कंपनी लिमिटेडकरिता**
**सही/-**
**दिनांक:** २९.०८.२०२० **राशेष मेहता**
**ठिकाण: मुंबई** **व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन:०८०९७१९७**

**BLUE PEARL TEXSPIN LIMITED**

**Regd Off:** Office No. 32, Vyapar Bhavan, 49, P.D. Mello Road, Mumbai -400 009, Maharashtra.
CIN: L36104MH1992PLC069447 | **Tel:** 022 32997884 **Fax:** 23487884
**Email:** bluepearltexspin@gmail.com | **Website:** www.bluepearltexspin.com

**Un-audited Financial Results for the Quarter ended 30.06.2020** (Rs. In Lakhs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 30.06.2020 | Year ended (31.03.2020) (Year to date Figures /Previous Year ending) | Quarter ended 30.06.2019 |
|---|---|---|---|---|
| | | Un-Audited | Audited | Un-Audited |
| 1 | Total Income from Operations | 3.33 | 23.22 | 12.34 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 0.4 | 0.13 | 1.11 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items ) | 0.4 | 0.13 | 1.11 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 0.4 | 0.13 | 1.11 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 0.4 | 0.13 | 1.11 |
| 6 | Equity Share Capital | 25.60 | 25.60 | 25.60 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | -34.37 | -34.37 | -34.48 |
| 8 | Earnings Per Share (Face value of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - | | | |
| | (a) Basic | 0.16 | 0,04 | 0.43 |
| | (b) Diluted | 0.16 | 0,04 | 0.43 |

**Note :** The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the websites of the Stock Exchange at www.bseindia.com (s) and the Company's website.

For **Blue Pearl Texspin Ltd**
Sd/-
**Mr. Arun Sharma**
Director | DIN : 00369461

Date : 29/08/2020
Place: Mumbai

**आयईएल लिमिटेड**
**(पुर्वीची इंडियन एक्स्ट्रॅक्शन लिमिटेड)**

**नोंदणीकृत कार्यालय:** नानावटी महालया, १८, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१.
**दूर.क्र.:**०२२-२२०४४४२२, **फॅक्स:**०२२-२२०४६०२४
**ई-मेल:**iel@nanavatigroup.com, **वेबसाईट:**www.nanavatigroup.com
**सीआयएन:** एल१५१४०एमएच१९५६पीएलसी००९७२०

**व्हीसी/ओएव्हीएममार्फत होणाऱ्या ६४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत कंपनीच्या सदस्यांना सूचना**

१. येथे सूचना देण्यात येत आहे की, आयईएल लिमिटेड (पुर्वीची इंडियन एक्स्ट्रॅक्शन लिमिटेड) च्या सदस्यांची ६४वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, २८ सप्टेंबर, २०२० रोजी दु.४.००वा. भाप्रवे सामायिक ठिकाणी सदस्यांच्या वास्तविक उपस्थितीशिवाय एजीएम घेण्याच्या सूचनेत नमुद विषयावर विमर्ष करण्याकरिता कंपनी कायदा २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्यातील नियमाअंतर्गत आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ सहवाचिता सहकार मंत्रालयाद्वारे वितरीत सर्वसाधारण परिपत्रक क्र.१४/२०२० दि.८ एप्रिल, २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र.१७/२०२० दि.१३ एप्रिल, २०२० व सर्वसाधारण परिपत्रक क्र.२०/२०२० दि.५ मे, २०२० (एमसीए परिपत्रके) आणि सेबीद्वारे वितरीत परिपत्रक क्र.सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दि.१२ मे, २०२० नुसार व्हिडीओ कॉन्फरन्सींग (व्हीसी)/अन्य दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम) मार्फत होणार आहे.

२. ६४व्या एजीएमची सूचना व वित्तीय वर्ष २०१९-२०२० करिता वार्षिक अहवाल (वार्षिक अहवाल) ज्या सदस्यांचे ई-मेल कंपनी/डिपॉझिटरी सहभागीदारकडे नोंद आहेत त्यांना विद्युत स्वरुपाने एमसीए परिपत्रक व सेबी परिपत्रकानुसार पाठविले आहेत.

३. ज्या सदस्यांचे ई-मेल डिपॉझिटरी/कंपनी/निबंधक व भागहस्तांतर प्रतिनिधी (आरटीए) यांना विनंती आहे की, त्यांनी खालीलपद्धतीने त्यांचे ई-मेल नोंद/अद्यायावत करावेत.

१) विद्युत/डिमॅट स्वरुपात डिपॉझिटरीकडे भागधारणा असल्यास त्यांनी संबंधित डिपॉझिटरी सहभागीदारकडे संपर्क करावा. तथापि, सदस्यांनी iel@nanavatigroup.com वर त्यांचे नाव, डीपी आयडी, क्लायंट आयडी, पॅन, मोबाईल क्रमांक व ई-मेल असे सर्व तपशील देऊन कंपनीकडे तात्पुरते नोंद करावे.

२) वास्तविक स्वरुपात भागधारणा असणारे सदस्य ज्यांचे ई-मेल कंपनी/डिपॉझिटरीकडे नोंद नाहीत त्यांनी ६४वी एजीएम सूचना, वार्षिक अहवाल आणि/किंवा व्हीसी/ओएव्हीएममार्फत ई-वोटिंगसह ६४व्या एजीएममध्ये सहभागी होण्याकरिता लॉगइन तपशील खालील दस्तावेज iel@nanavatigroup.com वर ई-मेल करून प्राप्त करावेत.

अ. तुमचे नाव, फोलिओ क्र. व संपुर्ण पत्ता नमुद करून स्वाक्षरी केलेली विनंती पत्र.

ब. पॅन कार्डनची स्वसाक्षांकीत स्कॅन प्रत

क. अन्य दस्तावेजाच्या स्वसाक्षांकीत स्कॅन प्रती (जसे आधारकार्ड, वाहन चालन परवाना, निवडणूक ओळखपत्र, पारपत्र) असे कंपनीसह नोंदणीकृत सदस्यांचे आळख पुरावा म्हणून सादर करावेत.

४) सदस्यांना व्हीसी/ओएव्हीएममार्फत ६४व्या एजीएममध्ये सहभागी होता येईल. याकरिता आवश्यक व्यवस्था कंपनीकडून लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या ई-वोटिंग सुविधेमार्फत केली जाईल. ६४व्या एजीएममध्ये सहभागी होण्यास आणि ६४व्या एजीएम दरम्यान ई-वोटिंगमार्फत मतदान किंवा विद्युत स्वरुपाने रिमोट ई-वोटिंगची पद्धत ६४व्या एजीएम सूचनेत नमुद आहे. व्हीसी/ओएव्हीएममार्फत सहभागी सदस्यांची कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अन्वये गणसंख्या उद्देशाकरिता मोजणी केली जाईल. ६४व्या एजीएमची सूचना व वार्षिक अहवाल कंपनीच्या www.nanavatigroup.com व बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

५) कंपनीच्या ६४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त मंगळवार, २२ सप्टेंबर, २०२० ते सोमवार, २८ सप्टेंबर, २०२० (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत कंपनीचे सदस्य नोंद पुस्तक व भागहस्तांतरण पुस्तक बंद ठेवण्यात येतील.

वरील माहिती ही कंपनीच्या सर्व सदस्यांच्या ज्ञान व फायद्याकरिता आणि एमसीए परिपत्रक व सेबी परिपत्रकानुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**आयईएल लिमिटेडकरिता**
**(पुर्वीची इंडियन एक्स्ट्रॅक्शन लिमिटेड)**
**सही/-**
**प्रियम एस. झवेरी**
**संचालक**

**दिनांक : २८.०८.२०२०**
**ठिकाण : मुंबई**

**जाहीर नोटिस**

सर्व लोकांना सूचना देण्यात येते की, घर मिळकत ज्याचा तपशील **सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, २री विंग, क्वीन ट्युलिप को.ओ.हो.लि., ट्युलिप २, क्वीन्स पार्क, साई पेट्रोल पंप समोर, मीरा भाईंदर रोड, मीरा रोड (पू), जि. ठाणे - ४०११०७,** ही मिळकत **कै. युगलकिशोर र. मिश्रा** यांच्या मालकीची असून, त्यांनी ती मिळकत २००६ साली विकत घेतली होती. मध्यंतरीच्या काळात म्हणजेच दि. ०७/०५/२०१३ रोजी **श्री. युगलकिशोर र. मिश्रा** यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यू नंतर आमचे अशील **श्रीमती सलहन्तिदेवी युगलकिशोर मिश्रा** मृत व्यक्तीचे वारसव (पत्नी) या नात्याने वरील मिळकती संदर्भातील मृत व्यक्तीचे असलेले सर्व अधिकार स्वतःच्या नावे होण्याकरिता दावा / मागणी करीत आहे. तरी या बाबत जर कोणाची काहीही हरकत / दावे असल्यास ती आमच्या खालील पत्त्यावर **१४ दिवसांचे** आत नोंदवावी. तसे न केल्यास आमचे अशील पुढील कारवाई पूर्ण करतील, आणि या विषयी कोणाचीही कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
**मंदार असोसीएटस एडव्होकेटस**
**(लॉ फर्म रजि क्र. I २१२२७)**
बी-१४, शांती शोप्पिंग सेंटर, रेल्वे स्टेशन समोर, मीरा रोड (पू), ता. व जि. ठाणे - ४०१ १०७
स्थळ : मीरा रोड दिनांक : ३०.०८.२०२०

**GOOD VALUE IRRIGATION LTD**

**Registered Address: Industrial Assurance Building, Churchgate, Mumbai -400020**
**CIN: L74999MH1993LC074167**
**Extract of the Standalone Un-audited Financial Results for the Quarter Ending on 30/06/2020**

₹ in Lacs

| Sr. No. | Particulars | Quarter ended on 30/06/2020 (Un-audited) | Quarter ended on 31/03/2020 (Audited) | Quarter ended on 30/06/2019 (Un-audited) | Year ended on 31.03.2020 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 0.00 | 0.03 | 0.00 | 0.03 |
| 2 | Net Profit for the period (before Tax, Exceptional and Extraordinary items) | -0.53 | -0.65 | -8.42 | -6.61 |
| 3 | Net Profit for the period before tax (after Exceptional items) | -0.53 | -0.65 | -8.42 | -6.61 |
| 4 | Net Profit for the period after tax (after Exceptional and Extraordinary items) | -0.53 | -0.65 | -8.42 | -6.61 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -0.53 | -0.65 | -8.42 | -6.61 |
| 6 | Equity paid up Share Capital | 1736.63 | 1736.63 | 1736.63 | 1736.63 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 10/- each) for continuing and discontinued operations : Basic and Diluted | 0 | 0 | 0.05 | 0.04 |

a) The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 29.08.2020

b) The Above is an extract of the details of format quarterly un-audited Financial results filed with BSE under Regulation 33of the SEBI(LODR) Regulations, 2015

b) The full format of the Quarterly Un-audited Financial Results are available on the websites of the Stock Exchange and the listed entity. (www.bseindia.com)

**For Good Value Irrigation Ltd**
**Sd/-**
**Sandip Pawar**
**Whole Time Director**
**DIN:05245634**

**Place: Mumbai**
**Date: 29/08/2020**

**ब्लॅक रोझ इंडस्ट्रिज लिमिटेड**
**BLACK ROSE**

**नोंदणीकृत कार्यालय:** १४५/ए, मित्तल टॉवर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१. **दूर.:**९१-२२-४३३३७२००,
**फॅक्स:** +९१-२२-२२८७३०२२, **ई-मेल:** investor@blackrosechemicals.com
**वेबसाईट:** www.blackrosechemicals.com, **सीआयएन:** एल१७१२०एमएच१९९०पीएलसी०५४८२८

**३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता एकमेव व एकत्रित अलेखापरिक्षित निष्कर्षाचा अहवाल**

(रु.लाखात ईपीएस व्यतिरिक्त)

| अ. क्र. | तपशील | एकमेव | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही ३०.०६.२०२० पुनर्विलोकीत | संपलेले वर्ष ३१.०३.२०२० लेखापरिक्षित | संपलेली तिमाही ३०.०६.२०१९ पुनर्विलोकीत | संपलेली तिमाही ३०.०६.२०२० पुनर्विलोकीत | संपलेले वर्ष ३१.०३.२०२० लेखापरिक्षित | संपलेली तिमाही ३०.०६.२०१९ पुनर्विलोकीत |
| १ | कार्यचलनातून एकूण उत्पन्न | २६२९.४५ | २५२२८.६९ | ५५११.३० | ४११०.६२ | ३७२६२.९८ | ८४३७.८० |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबपूर्व) | २८८.६५ | २७६४.४८ | ७९०.६६ | २९४.०१ | २८५५.६२ | ८१८.६६ |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर) | २८८.६५ | २६४०.८२ | ६६७.00 | २९४.०१ | २७३१.९७ | ६९५.00 |
| ४ | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर) | २०६.१४ | १९९५.३९ | ४५७.१० | २०९.८९ | २०६७.३५ | ४८५.१० |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीकरिता सर्वंकष नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वंकष उत्पन्न (करानंतर)) | १७६.८७ | २०१६.९८ | ४५९.00 | १८०.६२ | २०८८.९४ | ४८७.00 |
| ६ | समभाग भांडवल | ५१०.00 | ५१०.00 | ५१०.00 | ५१०.00 | ५१०.00 | ५१०.00 |
| ७ | राखीव (मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंद पत्रकात दिल्यानुसार पुर्नमुल्यांकित राखीव वगळून) | | | | | | |
| ८ | उत्पन्न प्रतिभाग (रू.१/-प्रत्येकी)(अखंडीत व खंडीत कार्यचलनाकरिता) | | | | | | |
| | मूळ | ०.४० | ३.९१ | ०.९० | ०.४१ | ४.०५ | ०.९५ |
| | सौमिकृत | ०.४० | ३.९१ | ०.९० | ०.४१ | ४.०५ | ०.९५ |

**टिप:**
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये बीएसई लिमिटेडसह सादर करण्यात आलेली ३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताचे एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com वेबसाईटवर व कंपनीच्या www.blackrosechemicals.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने व करिता**
**अनुप जटीया**
**कार्यकारी संचालक, डीआयएन: ००३५१४२५**

**दिनांक: २८.०८.२०२०**
**ठिकाण: मुंबई**